



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com






सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ५५ वा | मंगळवार, दि. १६ सप्टेंबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# महाराष्ट्रात पावसाचा हाहाकार; सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे १४२ कोटींचे नुकसान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** संपूर्ण राज्यात पावसाने धुमाकुळ घातला आहे. कोकणपासून ते पश्चिम महाराष्ट्रात मुसळधार पाऊस होत आहे. काही ठिकाणी ढगफुटी सदृष्य पाऊस झाला आहे. सोलापूर जिल्ह्यात चालू महिन्यात अंदाजे ६५ हजार हेक्टरवरील पिकांचे सुमारे ७४ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. नुकसानीचे पंचनामे सुरू असल्याची माहिती कृषी विभागाच्या वतीने देण्यात आली.

तर ऑगस्टमध्ये ५६ हजार ९०० हेक्टरवरील ६८ कोटींचे नुकसान झाले आहे. २४ तासांत ६५ मिलिमीटर पाऊस अतिवृष्टी म्हणून गणला जातो. दुसरीकडे सलग पाच दिवस सरासरी १० मिलिमीटर पाऊस हा सततचा पाऊस धरला जातो. दोन्ही पावसामुळे नुकसान झालेल्यांना सरकारकडून भरपाई दिली जाते. सलग चार दिवस ४० ते ५० मिलिमीटर पाऊस पडला आणि पाचव्या दिवशी १० मिलिमीटरपेक्षा कमी पाऊस झाला तरी तेथे भरपाई मिळत नाही. त्याचा फटका हजारो शेतकऱ्यांना बसणार आहे. दरम्यान, पंचनामे होऊन त्याचा अहवाल शासनाला सादर केला असला तरी भरपाईसाठी आता नवा निकष आला आहे. पाऊस पडण्यापूर्वीची पिकांची घनता व हिरवळ आणि पाऊस पडून १५ दिवस झाल्यानंतर १५ दिवसांनी पिकांची घनता व हिरवळ सॅटेलाईटद्वारे मोजली जाते. त्यानंतरच आता नुकसान भरपाई दिली जाणार असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

उजनी धरणाने यापूर्वीच शंभरी पार करीत धोकादायक पातळी गाठत आली आहे. त्यामुळे धरणातून भीमा नदी पात्रात सोडण्यात येणाऱ्या

**उजनीतून भीमा नदी पात्रात विसर्ग; नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा**



सोमवार सकाळी 1 लाखा क्युसेक्सपेक्षा अधिक विसर्ग सदृश्य स्थिती निर्माण झाली असून नदी काठच्या गावांना प्रशासनाच्या आला. त्यानुषंगाने खबरदारी म्हणून उजनी धरणाचे पुरनियंत्रणासाठी पाणलोट क्षेत्रातील पर्जन्यमान व येणारी पाण्याची आवक लक्षात घेता पुरनियंत्रणासाठी रविवारी रात्री पासून उजनी धरणाच्या सांडव्यावरुन भीमा नदीमध्ये पूर नियंत्रणासाठी पहिल्या टप्प्यात २५ हजार क्यूसेक्स त्यानंतर ६० हजार क्युसेक्स, ७५ हजार क्युसेक्स तर सोमवारी सकाळी अधिक वाढ करीत १ लाख क्यूसेक्स करण्यात आला.यामुळे नदीतील एकूण विसर्ग सांडव्यातून १ लाख क्यूसेक्स व विदयुत गृह १६०० क्यूसेक्स असा एकूण 1 लाख १ हजार ६०० क्यूसेक्स विसर्ग भीमा नदीमध्ये सोडण्यात येत आहे. तसेच पावसाच्या प्रमाणानुसार व धरणामध्ये येणाऱ्या पाण्याच्या आवक नुसार विसर्ग कमी जास्त होण्याची शक्यता आहे.यामुळे नदी काठांवरील गावांना व नागरिकांना प्रशासनाच्या वतीने सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

पांगरीत आठ तासांत ६५ मिलिमीटर पाऊस'; पिके पाण्यात; शेतकऱ्यांचे नुकसान, २० हजार कोंबड्यांचा मृत्यू गेल्या २० ते २५ दिवसांपासून गायब झालेल्या पावसाने काल (ता. १३) दुपारी सव्वा चारच्या सुमारास जोरदार एन्ट्री करत अवघ्या आठ तासांत तब्बल ६५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. या अतिवृष्टीमुळे परिसरातील नदी-नाले तुडुंब भरून वाहू लागले, तर शेतांमध्ये पाणी साचून तलावाचे स्वरूप दिसू लागले.

शेतकरी वगार्चे प्रचंड नुकसान झाले असून, सोयाबीन, उडीद, मुग, कांदा आदी पिकांवर पावसाचे पाणी साठल्याने शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान झाले आहे. उक्कडगाव येथील शेतकरी सुरेश मुंढे यांच्या पोल्ट्री शेडमध्ये पाणी शिरल्याने जवळपास १५ ते २० हजार कोंबड्यांचा मृत्यू झाला. याशिवाय ४० पोती पशुखाद्याचे नुकसान झाले आहे. तलाठी धस व कोतवाल अंकुश मुंढे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.

उक्कडगाव येथील शेतकरी अरूण पाटील यांच्या शेतात नदीचे पाणी शिरल्याने स्प्रिंक्लरचे सहा पाईप वाहून गेले. अशोक मुंढे यांचे स्प्रिंक्लर पाईप व विद्युत मोटार, संदीप मुंढे, विक्रम जाधवर यांच्या पाणबुडी मोटारी, वाघाची वाडी येथील संजय वाघ यांच्या विहिरीवरील मोटार पाण्याबरोबर वाहून गेली. उक्कडगाव-पांगरीसह पांढरी, येरमाळा, चोराखळी या गावांचा संपर्क तुटल्याने प्रवाशांना रात्रभर बाहेरच थांबावे लागले. रात्री उशिरापर्यंत कोसळणाऱ्या पावसामुळे पांगरी-ममदापूर या गावांचा संपर्कही तुटला. (पान 2 वर..)



# 'शिवस्मारक' उभे करायला सरकारला भाग पाडू - तानाजीराव शिंदे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवरायांच्या मुंबई येथील शिवस्मारकाचे जलपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हस्ते होऊन देखील गेल्या ९ वर्षात त्या ठिकाणी एक वीट देखील रचली गेली नाही, छत्रपतींचा आशीर्वाद घेऊन सत्तेवर आलेले सरकार शिवस्मारकाच्या विषयी एवढे उदासीन का ? असा सवाल "स्वराज्य संग्राम" चे प्रदेशाध्यक्ष तानाजीराव शिंदे यांनी आज सोलापूर येथे झालेल्या "स्वराज्य संग्रामच्या" वर्धापन दिन मेळाव्यात केला.

"स्वराज्य संग्राम" राज्यव्यापी मेळावा आज दिनांक 14 रोजी सोलापुरात संपन्न झाला त्यावेळी शिंदे बोलत होते. शिवस्मारकाबरोबर देशात समान नागरी कायदा लागू झाला पाहिजे, मराठा आरक्षण टिकले पाहिजे, सारथी संस्थेची व्याप्ती वाढवली पाहिजे, शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी मिळाली पाहिजे, आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाकडून थेट कर्ज योजना सुरू करून छोट्या उद्योजकांना एक लाख रुपये पर्यंतचे कर्ज मिळाले पाहिजे, महाराष्ट्रातील भ्रष्टाचार रोखण्यासाठी आंदोलन उभारणे, रायगडावरील जगदीश्वरांच्या मंदिराचा जीर्णोद्धार शासनाने करावा, महाराष्ट्रातील महिला, युवक व विद्यार्थ्यांच्या विविध विषयावर काम करणे आदी प्रमुख मुद्द्यांवर सदर मेळाव्यात चर्चा झाली राज्यभरातून आलेल्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

सदर मेळाव्यास स्वराज्य संग्रामचे प्रदेश सरचिटणीस विक्रांत आंब्रे रत्नागिरी, उपाध्यक्ष अजित बानगुडे कराड, अनंतराव देशमुख रायगड, बाळासाहेब जटाळ बीड, शरद किनीकर लातूर,तसेच सचिव विशाल जाधव पुणे, सोलापूर जिल्हाध्यक्ष संग्रामसिंह पवार, सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, ठाणे जिल्हाध्यक्ष प्रशांत मोरे आदी मान्यवर उपस्थित होते. मेळावा यशस्वी करण्यासाठी स्वराज्य संग्रामचे युवक कार्यकर्ते रामचंद्र शिंदे, माऊली जाधव, बाळासाहेब लांडे- पाटील, धनंजय चोबे, गंगाधर गायकवाड, अमोल सुरवसे, आनंद गायकवाड आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर गायकवाड यांनी केले तर आभार आकाश पवार यांनी मानले.


**विकणे /भाड्याने देणे आहे**

वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.

**संपर्क : डी. बी. शिंदे**

**मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३**

**पत्ता:** अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला


# सोलापूर जिल्हा परिषदेला मिळणार 23 वर्षानंतर ओबीसी नेतृत्व

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रातील ३५ जिल्हा परिषदेचे पहिल्या अडीच वर्षासाठी आरक्षण जाहीर झाले. सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद ओबीसी पुरुषांसाठी राखीव ठरले असून २३ वर्षांनंतर ओबीसी नेतृत्व मिळणार आहे. नवीन आरक्षण जाहीर सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद पुढील अडीच वर्षासाठी ओबीसी (सर्वसाधारण) प्रवर्गासाठी राखीव आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेला २००२ नंतर प्रथमच ओबीसी पुरुष अध्यक्ष मिळणार आहे. ओबीसीबरोबरच कुणबी दाखला असलेले मराठा नेतेही रिंगणात उतरू शकतात, त्यामुळे स्थानिक राजकारणात मोठी चुरस अपेक्षित आहे.

राज्यातील ३५ जिल्हा परिषदांचे आरक्षण जाहीर झाले आहे, हे आरक्षण पहिल्या अडीच वर्षासाठी असणार आहे. गेली काही वर्षांपासून प्रशासकाच्या हाती असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या निर्णयामुळे लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी राखीव झाले आहे, त्यामुळे सोलापूर जिल्हा परिषदेला तब्बल २३ वर्षांनंतर ओबीसी प्रवर्गातील पुरुष अध्यक्ष मिळणार आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेत यापूर्वी नारायण खंडागळे हे ओबीसी पुरुष अध्यक्ष झाले होते, त्यावेळी



मराठा कुणबी कार्ड ओबीसी जागेवर वापरण्यात आले होते. सध्याच्या परिस्थितीत कुणबी नोंद असलेल्या मराठा समाजातील नेत्यालाही अध्यक्षपदावर संधी मिळू शकते, त्यामुळे मूळ ओबीसींबरोबरच मराठा कुणबी दाखला असलेले मराठा समाजातील नेत्यांमध्ये अध्यक्षपदासाठी मोठी स्पर्धा रंगणार आहे.

करमाळ्याचे नारायण खंडागळे हे २००२ मध्ये सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष झाले होते. त्या वेळी मराठा कुणबी कार्डचा वापर सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात करण्यात आला होता. मराठा असलेले मोहिते पाटील समर्थक नारायण खंडागळे यांच्याकडे कुणबी प्रमाणपत्र असल्याने त्यांची अध्यक्षपदी वर्णी लागली होती. ते माजी राज्यमंत्री (पान 2 वर..)







# AIMIM सोलापूरच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** AIMIM सोलापूर अध्यक्ष फारूक शाब्दी यांच्या आदेशानुसार सोलापूरातील पावसाच्या थैमान मुळे अतिवृष्टी झालेल्या नुकसान भरपाई साठी पंचनामे करून लोकांना आर्थिक मदत देणेबाबत व शहरात कचरा, ड्रेनेज, नालेसफाईचा प्रश्न तसेच सार्वजनिक शौ चालयाचा विषय गंभीर आहे, यावर कायमस्वरूपी तोडगा काढणे बाबत पक्षाच्या वतीने सोलापूर जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.



सोलापूरात मुसळधार पावसाचा थैमान सुरूच आहे, अतिवृष्टीमुळे संपूर्ण सोलापुरात हाहाकार उडाला आहे, सखल आणि झोपडपट्टी भागात घरात पाणी शिरल्याने नागरिकांना आणखी त्रास झाला आहे , गेल्या दोन ते तीन दिवसापासून नागरिक घरातील पाणी काढत आहेत. घरात पाणी शिरल्याने संसार उपयोगी सर्व वस्तूंचे नासधूस झालेली आहे, कपडे अन्न धान्य वाहून गेलेले आहे. या कठीण काळात सरकारने तातडीने मदत पोहोचवणे गरजेचे आहे व या संकटातून बाहेर येण्यासाठी आर्थिक मदत करणे फार गरजेचे आहे.

१) राज्य नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन विभागांतर्गत पुनर्वसन विभागाकडून आर्थिक मदत दिली जाते, त्यासाठी जिल्हा प्रशासनाने केलेल्या पंचनाम्याचा अहवाल महत्त्वाचा असतो त्यामुळे प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संपूर्ण शहरात पाहणी करून सर्व नुकसान झालेल्या नागरिकांचे पंचनामे करून प्रत्येकाला नुकसान भरपाई म्हणून जास्तीत जास्त आर्थिक मदत देण्यात यावी.

कोणत्याही प्रकारचे भेदभाव न करता सरसकट सर्व लोकांना आर्थिक मदत देण्यात यावी जेणेकरून नुकसान झालेला एक ही व्यक्ती मदतीपासून वंचित राहू नये

घर दुरुस्तीसाठी 6500 रुपये, कपड्यांसाठी पाच हजार रुपये, संसार उपयोगी वस्तूंसाठी अडीच हजार रुपये जाहीर करण्यात आलेले आहे.

तसेच नुकसान झालेल्या कच्च्या घरांसाठी साडेचार हजार रुपये, तर पक्क्या घरांसाठी साडेसहा हजार रुपये जाहीर झालेले आहे.

वस्तुस्थिती पाहता पक्क्या घरांपेक्षा कच्च्या घरांना जास्त नुकसान होतो, म्हणून पक्क्या घरांपेक्षा जास्त रक्कम कच्च्या घरांना देण्यात यावे.

२) माननीय जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दोन दिवसांमध्ये पंचनामे करण्याचे आश्वासन देण्यात आलेले आहे हे आश्वासन दोन दिवसांमध्ये पूर्ण होऊ शकत नाही, म्हणून घाई गडबडीमध्ये पंचनामे करण्यात येऊ नये,

शहरात जाऊन लोकवस्तीत जाऊन, झोपडपट्टयांमध्ये जाऊन, परिस्थितीची समक्ष पाहणी करून पंचनामे करण्यात यावे आणि नागरिकांच्या समस्या सोडवण्यात यावे

३) शहरात कचरा, ड्रेनेज, नालेसफाईचा प्रश्न तसेच सार्वजनिक शौचालयाचा विषय गंभीर आहे, यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यात यावा, शहरांच्या मुख्य नाल्यांमध्ये झाडी झुडपे मोठी झाल्याने नाल्यातील कचरा तुडुंब भरून वाहत आहे

सर्व झाडे झुडपांची तोडणी करून नाल्याची साफसफाई करून पाण्याचा मार्ग मोकळा करण्यात यावा संबंधित विभागास आदेश करण्यात यावे असे निवेदन देण्यात आले.

# असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्स सोलापूरच्या अध्यक्षपदी इंजी. बी. एम. जाधव, सचिवपदी इंजि. संतोषकुमार बायस

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर येथीलअसोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्स सोलापूर च्या अध्यक्षपदी इंजी. बी एम जाधव यांची आज संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत एकमताने निवड करण्यात आली.

सोलापूरतील प्रसिद्ध हेरिटेज मंगल कार्यालयात संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत वरील निवड करण्यात आली पुढील पदाधिकारी असे उपाध्यक्ष इंजी. वैभव होमकर सचिव संतोष कुमार बायस खजिनदार इंजी. मनोज महेंद्रकर यांची एकमताने निवड करण्यात आली.





15 सप्टेंबर 2025 ते 15 सप्टेंबर 2027 पर्यंत यांचा कार्यकाळ असेल सदर कार्यकाळात असोसिएशन च्या अडचणी सोडवणे, अभ्यास दौरे करणे, सिविल अभियंत्याच्या उपयोगासाठी असणारे सेमिनार घेणे, सर्व शासकीय अधिकाऱ्यांबरोबर टेक्निकली गोष्टींच्या चर्चा करून असोसिएशनच्या अभियंत्याच्या अडचणी सोडवणे. सामाजिक कार्य करणे असे विचार अध्यक्ष बी एम जाधव यांनी व्यक्त केले.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्थापत्य प्रदर्शन सोलापूरचे वैभव असून ते आधिका अधिक चांगले होण्या करिता प्रयत्न करणार आहोत असे त्यांनी सांगितले. पुढील कार्यकारणी सदस्य याप्रमाणे इंजी. हनुमानप्रसाद गज्जम, इंजी. जवाहर उपासे, इंजी. दत्तात्रय घोडके, इंजी. गणेश इंदापुरे इंजी सुनील दूधगुंडी इंजी. मनोहर लोमटे इंजिनीयर प्रवीण हेडगिरे, इंजी हरी चव्हाण इंजी नितीन पवार इंजी सतीश महिंद्रकर असे आहेत.

# बार्शी तालुक्यातील पिकांचे मुसळधार पावसामुळे नुकसान



**बार्शी, (कटुसत्य वृत्त):** बार्शी तालुक्यात मुसळधार झालेल्या पावसामुळे शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. शेतात पाणी गेल्याने शेतकरी चिंतेत आहे. शनिवारी सायंकाळी सुरू झालेला पाऊस रात्री उशिरापर्यंत सुरू होता. दरम्यान, या पावसामुळे बार्शी तालुक्यातील श्रीपत पिंपरी, जामगाव, तांदूळवाडी आदी गावात ओढे भरून बाहिल्याने वाहतूक बंद झाली.

तालुक्यातील तांदुळवाडी वासह खांडवी, भोवरे आदी गावात शेतात पाणी गेल्याने नुकताच पेरणी झालेल्या कांद्याचे बी वाहून गेले. तालुक्यातील तांदूळवाडी गावातील सागर गरड यांच्या कांद्याची पेरणी केलेल्या शेतातून मोठ्या पाण्यासह पीकही वाहून गेले. तालुक्यात कालच्या मोठ्या पावसाने काढणीस आलेला उडीद, सोयाबीन, कांदा पिकाचे खूप मोठे नुकसान झाले आहे. ऐन सणाच्या तोंडावर शेतकऱ्यांना या नुकसानीचा सामना करावा लागला आहे. रविवारी सुट्टी असल्याने सोमवारी याबाबत प्रशासनाने तत्काळनुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करावेत, अशी मागणी शेतकरी करीत आहेत. शेतात पाणीच पाणी झाले असताना अनेक गावांचा संपर्क शहराशी तुटला आहे.

# मंद्रुप आणि अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयांना ऑक्सिजन कॉन्सेंट्रेटर मशिन्सचे वाटप



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवत माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळ पुणे व राजस्थान रॉयल्स यांच्या वतीने तसेच महा एनजीओ फेडरेशनच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्यातील मंद्रुप आणि अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयांना ऑक्सिजन कॉन्सेंट्रेटर मशिन्स देण्यात आले.

महा एनजीओ फेडरेशनचे संचालक अमोल उंबरजे म्हणाले की, 'या उपक्रमामागचा उद्देश म्हणजे ग्रामीण भागातील सामान्य व गरजू रुग्णांना वैद्यकीय उपयोग होऊन वेळेवर उपचार मिळावेत. माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळ व अध्यक्ष शेखर मुंदडा यांच्या सातत्यपूर्ण सहकार्यामुळे असे उपक्रम शक्य होत आहेत.'

ग्रामीण रुग्णालय मंद्रुपचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अशोक राठोड यांनी सांगितले की, '२४ तास अत्यावश्यक सेवा देणाऱ्या ग्रामीण रुग्णालयासाठी हे ऑक्सिजन कॉन्सेंट्रेटर मशिन्स अतिशय उपयुक्त ठरतील आणि गरजू रुग्णांना वेळेवर मदत मिळेल.'

याशिवाय पुण्यातील ससून रुग्णालय व कराड तालुक्यातील डोणजे येथील कौशल्या ग्रामीण रुग्णालय यांनाही मशिन्स उपलब्ध करून देण्यात आले असून, एकूण ४ मशिन्सचे वाटप करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळाचे ट्रस्टी सुशीला राठी, सचिव लक्ष्मीकांत नावंदर, महा एनजीओ फेडरेशनचे संचालक अमोल उंबरजे, मुकुंद शिंदे, योगेश बजाज, इराण्णा केंचगुंडी तसेच रुग्णालयातील डॉक्टर व प्रतिनिधी उपस्थित होते.

# सोलापूरातील सिद्धी सुझुकी अन बजाज शोरूमला भीषण आग



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** होटगी रोडवरील सिद्धी सुझुकी शोरूम व बजाज शोरूमला रविवारी (ता. १४) भीषण आग लागून त्यात अंदाजे ३५ ते ५० लाखांचे नुकसान झाले आहे. रविवारी शोरूम बंद होते. आतून धूर येऊ लागल्यानंतर वॉचमनने तत्काळ मॅनेजरला त्याची माहिती दिली आणि अग्निशामक विभागाला कळविले. या आगीत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

रविवारी दुपारी दोनच्या सुमारास बजाज शोरूममधून धूर येऊ लागला. आतून धूर येत असल्याचे पाहून वॉचमनने लगेच व्यवस्थापकास (मॅनेजर) संपर्क साधून आग लागल्याचे सांगितले. त्यांनी तातडीने अग्निशामक विभागाला १०१ क्रमांकावरून घटनेची माहिती दिली. काही वेळातच अग्निशामकचे बंब घटनास्थळी पोचले. तोपर्यंत आग पसरत जाऊन जवळील सिद्धी सुझुकी शोरूममध्येही शिरली आणि तेथील साहित्य आगीत भस्मसात झाले.

अग्निशमन दलाचा बंब घटनास्थळी दाखल झाल्यावर त्यांनी आग विझविण्याचे काम सुरू केले. पण, आगीत आठ दुचाकी वाहने, मशिनरी, वर्कशॉपमधील साहित्य जळून खाक झाले होते. या शोरूममध्ये असलेल्या ऑइलमुळे आग जास्त भडकल्याचे अग्निशामकच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. आगीच्या उंच ज्वालामुळे धुराचे लोट आकाशात पसरले होते. घटनास्थळी बघ्याची मोठी गर्दी झाली होती. आग कशामुळे लागली, नुकसान किती झाले, याची नेमकी माहिती समजू शकली नाही.

अग्निशमन दलाने एकूण आठ बंब पाणी मारून आग आटोक्यात आणली. काही कर्मचारी आग आटोक्यात आणण्यासाठी शोरूमवर चढले होते. त्यांनी दोन-अडीच तासांनी आग आटोक्यात आणली. या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही, अशी माहिती महापालिका अग्निशामक दलाचे प्रभारी अधीक्षक अच्युत दुधाळ यांनी दिली.

# शेतकऱ्यांच्या मदतीसाठी आमदार कल्याणशेट्टी बांधावर

## अतिवृष्टीग्रस्त पिकांची पाहणी, पंचनाम्यांचे तातडीचे आदेश



**कुंभारी, (कटुसत्य वृत्त):-** दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी, वळसंग, बोरामणी गटात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकयांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सोयाबीन, कांदा, उडीद, तूर, भाजीपाला यासारख्या पिकांना पावसाचा फटका बसला असून अनेक शेतजमिनी पाण्याखाली गेल्या आहेत. या पार्श्वभूमीवर अक्कलकोट मतदारसंघाचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी विविध गावांना प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली.

या पाहणी दौयात आमदारांसोबत मंडल अधिकारी संतोष फुलारी, तलाठी समाधान काळे, ग्रामविकास अधिकारी प्रेमदास पवार, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य अण्णाराव बाराचारे, उपसरपंच राजशेखर कोरे, विजयकुमार शबाशे, माजी उपसरपंच सूरज पाटील, ग्रामपंचायत सदस्य शिवानंद आंदोड़गी पाटील, पंचायत समितीचे माजी सदस्य सागर तेली, माजी सरपंच गेनसिद्ध भोरगुडे आप्पासाहेब गाडेकर, आप्पासाहेब वंटे, तसेच महसूल आणि कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते. आमदार कल्याणशेट्टी यांनी शेतकऱ्यांचे दुःख ऐकून घेत प्रत्येक शेतकऱ्याचे नुकसान वेळेत नोंदवले गेले पाहिजे. पंचनामे तत्काळ पूर्ण करून मदत मिळावी, यास प्राधान्य असल्याचे सांगितले.

**शेतकऱ्यांशी साधला संवाद**

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी गावागावांतील शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. शेतकरी हा देशाचा कणा आहे आणि त्याला संकटात एकटे सोडणार नाही, शेतकऱ्यांच्या हक्कासाठी विधानसभेत आणि शासनदरबारी ठामपणे आवाज उठवणार आहे, असल्याचे कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

# आदिवासी विकास योजनांच्या अर्जातील त्रुटींची पूर्तता ३० सप्टेंबरपर्यंत करण्याचे आवाहन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लीअस बजेट) योजनेअंतर्गत अनुसूचित जमातीच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना राबविण्यात येतात. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी सोलापूर व धाराशिव जिल्ह्याकरिता एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर कार्यालयामार्फत लाभार्थ्यांकडून वैयक्तिक व सामूहिक (बचतगट) योजनांसाठी https://www.nbtribal.in या पोर्टलवर अर्ज मागविण्यात आले होते.

प्रकल्प अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अनेक अर्जांमध्ये आवश्यक कागदपत्रांची त्रुटी आढळून आल्याने संबंधित अर्जदारांना त्रुटी लावून अर्ज परत पाठविण्यात आले आहेत. या त्रुटींची यादी कार्यालयाच्या नोटिस बोर्डवर तसेच पोर्टलवरील लाभार्थी लॉगिनमध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आली आहे.

**अंतिम मुदत - ३० सप्टेंबर २०२५**

सदर त्रुटींची पूर्तता ३० सप्टेंबर २०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत ऑनलाईन पद्धतीने करणे आवश्यक आहे. लाभार्थ्यांनी स्वतःचा आयडी व पासवर्ड वापरून पोर्टलवर लॉगिन करावे व आवश्यक कागदपत्रे अपलोड करून त्रुटींची पूर्तता करावी, असे आवाहन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर यांनी केले आहे.

**अर्जदारांसाठी सूचना:**

- त्रुटींची यादी तपासून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे
- वेळेत पूर्तता न झाल्यास अर्ज अपात्र ठरू शकतो
- पोर्टलवर लॉगिन करताना वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवावी.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-

8083608083
9922646566
8698732109

# 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' बुधवारी राज्यस्तरीय शुभारंभ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान" शासनाच्या या महत्त्वाकांक्षी अभियानाचा शुभारंभ बुधवार दि.१७ सप्टेंबर, २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून होणार आहे. सोलापूर जिल्ह्यात सर्व ग्रामपंचायती मध्ये या अभियानाचा शुभारंभ होणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मौजे किनगाव ता. फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर येथे सकाळी १० वाजता या अभियानाचा शुभारंभ होणार आहे.

सोलापूर जिल्हयातील सर्व खासदार,आमदार, जिल्हा व तालुकास्तरीय सर्व खाते प्रमुख हे त्यांच्या कार्यक्षेत्रातील एक ग्रामपंचायतीस उपस्थित राहून अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करणेकरिता अभियानाचा शुभारंभ करणार आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील लोकांच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असलेल्या अभियानात सहभागी होऊन अभियान यशस्वी करावे. असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले आहे.

राज्यस्तरीय कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण प्रादेशिक विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत या चारही स्तरावर करण्यात येणार असल्याचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ यांनी सांगितले.

दिनांक 17.09.2025 रोजीच्या सर्व ग्रामसभांच्या ठिकाणी शुभारंभ कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. सकाळी 08.45 ते सकाळी 9 वाजता ग्रामसभा होणार आहे. सकाळी 9 ते सकाळी 9.10 : अभियाना बाबत ग्रामस्थांना आवाहन करणेत येणार आहे. सकाळी 09.10 ते सकाळी 09.40 या वेळेत प्रविण प्रशिक्षकांकडून अभियानाची सविस्तर माहिती देणेत येणार आहे असेही उप मुख्य कार्यकारी सुयंर्कात भुजबळ यांनी सांगितले. सकाळी 09.40 ते सकाळी 10.00 : उपस्थित मान्यवरांचे मार्गदर्शन तर सकाळी 10.00 : मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाच्या राज्यस्तरीय शुभारंभ होणार असल्याचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ यांनी सांगितले.

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

**9822964815**
**9421984815**

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) राष्ट्रवादीचे नाशिक जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते २) महाराष्ट्रातील एक जिल्हा, या जिल्ह्यातून गोदावरी नदी वाहते ३) माकड ४) स्वभावाने रागीट ५) क्रिकेटमधील फलंदाजाच्या हातातील लाकडी फळी (इंग्रजीत) ६) मिरच्या व गरम मसाला वापरून बनविलेले तिखट ९) जुनाच्या विरूध्दार्थी शब्द १२) गुटर घुं करणारा पक्षी १३) आर्थिक व्यवहारात केलेला घोटाळा १५) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) १७) उत्तरप्रदेश संक्षिप्तमध्ये असे लिहितात-** १९) घर (हिंदीत) २०) तिखट न टाकता डाळीचे बनविलेले कालवण २१) मनसे अध्यक्ष-** ठाकरे २३) फसवणूक करणारा २५) झुणका बनविण्यासाठी केलेले डाळीचे पीठ-*** पीठ २७) आवकच्या विरूध्दार्थी २८) रोख ३०) स्वत:वरील विश्वास, सचिन पिळगावकरचा एक चित्रपट ३२) दैत्य, राक्षस ३४) पुष्कळ, भरपूर ३५) धातूचा बारीक तंतू ३६) अध्ययन, रिडिंग (मराठीत) ३७) लिंबूपाण्याचे पेय ३३) सूर्य ३९) गंध, परीमळ ४१) मुंबईतील प्रमुख रेल्वे स्टेशन ४३) एक दुग्ध पेय ४५) सहा गुणिले दोन

**आडवे शब्द :** १) यात्रेनिमित्त देवाची वाजतगाजत काढलेली मिरवणूक ३) पश्चिम बंगालच्या महिला मुख्यमंत्री ७) खा. अमोल कोल्हे यांचा लोकसभा मतदारसंघ ८) वर्गातील मुलांची एकूण संख्या ९) बोल्टचा जोडीदार, अभिनेता १०) जवळ, समीप ११) कपडे वा मौल्यवान वस्तू ठेवण्याची मोठी पेटी १३) पायात चप्पल न घालता चालणे १४) हॉटेलमधील नोकर १५) खडबडीत (इंग्रजीत) १६) सीताहरण प्रसंगी रावणाशी लढा देणारा मोठा पक्षी १८) एक सद्गुरू-***** पै २२) धान्याचे केलेले बारीक चूर्ण २४) पटाईत, पारंगत २६) शिवसेनेचे मुंबईतील एक नेते-**** किर्तीकर २९) कोकणात आढळणारे वरून काटेरी पण आत गोड गरे असणारे मोठे फळ ३०) चार दुणे ३१) तमाशातील नाट्यप्रकार ३२) दरवाजा ३३) फायदा, लाभ ३५) शक्तीमान, ताकद असलेला ३८) शासकीय कार्यालयीन सुट्टीचा वार ४०) स्वादिष्ट, रूचकर ४२) एकमेकाबद्दल असलेली खात्री, हमी ४३) एक म्हण-*** तोंडी मोठा घास ४४) शब्दाला असलेले वजन, दरारा ४६) दोरी ४७) श्रीरामाचा एक बंधू, कैकयी पुत्र

## सुडोकु - 55

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 5 | | | 4 | 2 | |
| | 5 | | | | 9 | 6 | | |
| 6 | 8 | 7 | | | | | 1 | 5 |
| | | 9 | 6 | 5 | 8 | 1 | 3 | 2 |
| | | 2 | | 4 | | | | 8 |
| | | | | 9 | 1 | | 6 | 4 |
| 3 | | | | | 2 | | | |
| 7 | 2 | | | 1 | | 3 | 4 | 9 |
| 8 | 9 | 1 | | | 7 | | 5 | |

